# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२-२९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र. ५०-२२ दिनांक १४/०२/२०२२

## "मणिकपुर पोलीसांच्या सतर्कतेमुळे प्रवासी महिलेस हरवलेला मोबाईल मिळाला परत"

दि.१२/०२/२०२२ रोजी १९.३० वाजता दरम्यान वसई रेल्वे स्टेशन पुर्व परिसरामध्ये कुमारी काजल चवणकर हया प्रवासी रिक्षातुन प्रवास करीत असताना त्यांचा **iphone- sx** कंपनीचा ५०,०००/- रुपये किमतीचा मोबाईल, प्रवासी रिक्षात विसरल्यामुळे त्यांनी मणिकपुर पोलीस ठाणेस मदत मागितली होती.सदर वेळी दिवसपाळी कर्तव्यावर असलेले पोलीस उपनिरीक्षक तडवी, पो. अंम. किरण पवार यांनी नमुद मोबाईलचा ॲपल आयडी पासवर्ड उपलब्ध नसताना तसेच प्रवासी रिक्षा क्रमांका बाबत काही एक उपयुक्त माहिती नसताना, देखील सदर रिक्षाचा व मोबाईलचा तांत्रिक मदतीच्या सहाय्याने शोध घेवुन कु.काजल चवणकर यांना त्यांचा मोबाईल शोधुन दिला.

सदरची कामगिरी ही माणिकपुर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भाउसाहेब आहेर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक तडवी, पो. अंम. किरण पवार यांनी पार पाडली आहे.सदर अधिकारी व अंमलदार यांच्या सतर्कतापूर्वक केले कामगिरी बाबत वरिष्ठ अधिका-यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

----------0000---------